# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

**वार्षिक पारितोषिक वितरण आणि गुणगौरव समारंभ**



# क्षमतेची आकांक्षा नसेल, तर जीवनाचे डबके

## पद्मश्री शीतल महाजन : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पारितोषिक, गुणगौरव समारंभ

राजगुरुनगर, दि. २ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना ध्येयवादी वृत्तीने स्वतःच्या क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कारण क्षमता वाढविण्याची आकांक्षा नसेल तर जीवनाचे डबके होते. जीवनाला प्रवाही करण्यासाठी आपण सर्वांनी गती आणि सामर्थ्याचा संकल्प करायला हवा, असे आवाहन जागतिक कीर्तीच्या पॅरा जम्पर पद्मश्री शीतल महाजन यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात महाजन बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, मुलीधर खांगटे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, पर्यवेक्षक जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी शीतल महाजन यांनी त्यांचा पॅरा जम्पिंगचा अनुभव विद्यार्थ्यांना सांगितला. उत्तर व दक्षिण ध्रुवावर प्रशिक्षणाशिवाय पॅराजम्पिंग करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला असल्याचे त्यांनी सांगितले. मुलींनीही कौटुंबिक जबाबदाऱ्या, मानसिक संकटकुशंका यांना दूर सारून यशप्राप्ती करावी. आपले छंद जोपासावेत. अर्थात छंदामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या पालकांना अभिमान वाटेल असे काही तरी करून दाखवा. आपल्या जडणघडणीत कुटुंबाचा पाठिंबा महत्त्वाचा असून त्यांच्या सहकार्याशिवाय आपण काहीही करू शकत नाही, असे त्यांनी सांगितले.



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व मेडल देताना पद्मश्री शीतल महाजन, देवेंद्र बुट्टेपाटील व इतर मान्यवर.

तुमच्या आत्मविश्वासावर जग जिंकू शकता. इंजिनिअर व्हा, डॉक्टर व्हा, मोडेल व्हा फक्त जिद्द ठेवली पाहिजे. मुलींनी पुढे येऊन त्यांचे जे स्वप्न आहे ते साकार करण्याचा प्रयत्न करा.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी गगनझेप घेणाऱ्या शीतल महाजन यांचा आदर्श ठेवून दुर्दम्य आकांक्षेच्या जोरावर आपले ध्येय साध्य करावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमात बायोटेक या संकल्पनेवर आधारित असलेल्या प्रज्योत वार्षिकांकाचे प्रकाशन शीतल महाजन यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, सूत्रसंचालन शारीरिक शिक्षण संचालक प्रा. प्रतिमा लोणारी व प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी पाहुण्यांचा परिचय डॉ. संजय शिंदे यांनी केले तर प्रा. प्रतीक्षा गायकवाड यांनी आभार मानले.

### यांचा गौरव

चंदगड येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत पुणे विद्यापीठ निवड झालेल्या सोनल बर्वे हिचा विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय वेटलिफ्टिंगमध्ये आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक मिळवलेली सोनल कानडे, नेटबॉल आंतरविभागीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवलेली संध्या काळे, महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ६६ किलो वजनी गटात उपविजेते ठरलेल्या शिवराज राक्षे आणि महाराष्ट्र राज्य पॅराऑलिम्पिक स्विमिंग स्पर्धेत रौप्यपदक मिळवणारा विशाल कोलवाल यांचाही सन्मान करण्यात आला. याशिवाय राष्ट्रीय सेवा योजना विभागात व सांस्कृतिक विभागात विशेष योगदान दिलेल्या मधुरा वाघ, यशेश सुंबरे, पायल नेटके, काजल कोऱ्हाडे, निकिता हंगे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

लोकमत पुणे, शनिवार, दि. ४ फेब्रुवारी २०१७

# क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज

## शीतल महाजन : पारितोषिक वितरण



जनप्रवास ५
गुरुवार, दि. ९ फेब्रुवारी २०१७

# स्वतःच्या क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करा : महाजन



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख